Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 19/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक

ताराबाई मोडक या प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक होत्या. त्यांचा जन्म १९ एप्रिल १८९२ रोजी मुंबई येथे झाला. १९१४ मध्ये ताराबाई मुंबई विद्यापीठातून बी. ए. झाल्या. त्यांनी कृष्णा वामनराव मोडक यांच्याशी १९१५ मध्ये नोंदणी पद्धतीने प्रेमविवाह केला. ताराबाई १९२२ मध्ये राजकोट येथे बार्टन फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये लेडी सुपरिटेंडंट म्हणून रुजू झाल्या. या पदावर काम करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला होत. त्यानंतर त्यांनी गिजुभाई बधेका यांच्या साह्याने भावनगर येथे मॉंटेसरीच्या तत्त्वांवर आधारलेली 'गीता शिक्षण पद्धती' निश्चित केली. हाच ताराबाईंच्या बालशिक्षण कार्याचा प्रारंभ होय.

१९२३-१९३२ ही ९ वर्षे त्यांनी भावनगरच्याच दक्षिणामूर्ती शिक्षणसंस्थेत प्राध्यापिका म्हणून काम केले. १९३३ पासून त्यांनी शिक्षणाबाबतची शिक्षणपत्रिका काढायला सुरुवात केली. १९३६ मध्ये त्यांनी नूतन बालशिक्षण संघाची स्थापना केली. पुढे बालशिक्षणाचे हे लोण महाराष्ट्रात पसरले. १९३६-१९४८ मध्ये त्यांनी दादरच्या हिंदू कॉलनीत शिशुविहार नावाची संस्था स्थापन केली. प्राथमिक शाळेत मुलांची अनुपस्थिती हा गंभीर प्रश्न होता. मुले शाळेत हजर राहावीत म्हणून ताराबाईंनी गृहभेटी, प्रचार फेऱ्या, दिंडी, मुलांसाठी बैलगाडीची सोय, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविले. त्याचबरोबर भातशेती या मूलोद्योगाच्या माध्यमातून विज्ञान, गणित, भाषा हे विषय शिकविण्याचा प्रयत्न केला. यामुळे मुलांना शिक्षण घेण्यात गोडीदेखील वाटू लागली. शहराच्या ठिकाणाहून कोणतीही शैक्षणिक साधने न आणता त्यांनी विद्यार्थ्यांना रंग, स्पर्श, वजन मापन, अंक, आकार इत्यादी संकल्पना समजाव्यात, याकरिता पिसे, बांगड्या, शंख, दगड, बिया, माती, रेती, बांबुफळे, डब्या इत्यादी स्थानिक वस्तूंचाच वापर केला. ताराबाई यांचे ३१ ऑगस्ट १९७३ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 19, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401